# मधुमक्षिका पालन

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून, भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

मधमाशांचे पालन व्यवस्थित केले आणि त्यापासून मिळणारा मध एकत्रित करून तो बाटल्यात भरून विकला तर एक एकर शेतात ठेवलेल्या मधमाशांच्या पेट्यातून वर्षाकाठी ५० हजार ते ६० हजार रुपयांचा मध जमा होऊ शकतो. मध हे एक शक्तीदायक, पौष्टीक अन्न व औषध आहे. मधमाशांचे मेण हे सौंदर्य प्रसाधने तसेच औद्योगिक उत्पादनाचा घटक आहे. केवळ मध व मेणासाठीच नव्हे तर मधमाशांकडून होणाऱ्या परागीकरणामुळे उत्पादनात चांगल्या प्रमाणात वाढ होते.

त्यामुळे प्रकल्प क्षेत्रामध्ये मधुमक्षिका पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत " मधुमक्षिका पालन " या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

**उद्देश:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गाव समूहात "मधुमक्षिका पालन" या घटकांतर्गत मधुमक्षिका पालनाद्वारे भूमिहीन व्यक्ती/ शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे.
२. ग्रामीण भागातील मधुमक्षिका पालन व्यवसायास चालना मिळावी व आहारामध्ये मधाचा समावेश व्हावा.

**लाभार्थी निवडीचे निकष**

प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) लाभार्थी निवडतांना भूमिहीन व्यक्ती, अत्यल्प व अल्प भूधारक शेतक-यांमधील अनुसूचित जाती, जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने लाभार्थ्यांची निवड करावी.

**अर्थसहाय्य**

मधुमक्षिकापालन या घटकाचे खालीलप्रमाणे आर्थिक निकष आहेत.

| अ.न | तपशील | दर | एकूण खर्च रु. (कमाल ५० संचासाठी) | सर्व लाभार्थी - ४० % अनुदान रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मधुमक्षिका संच | रु.२०००/-प्रती मधुमक्षिका संच (४ खणांची चौकट, राणीमाशीसह मधमाशांचे पोळे) नुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ४० टक्के कमाल रु.८००/ संच | १,००,०००/- | ४०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मधुमक्षिका वसाहत (स्टँडर्ड मधुमक्षिका पेटी) | रु.२०००/-प्रती स्टँडर्ड मधुमक्षिका पेटीकरीता प्रत्यक्ष खर्चाच्या ४० टक्के कमाल रु.८००/ संच | १,००,०००/- | ४०,०००/- |
| ३ | मध काढणी यंत्र व फुड ग्रेड मध कंटेनर | रु.२०,०००/-प्रती युनिट प्रमाणे प्रत्यक्ष खर्चाच्या ४० टक्के कमाल रु.८०००/ संच | २०,०००/- | ८,०००/- |
| **एकूण** | | | **२,२०,०००/-** | **८८,०००/-** |

या घटकाअंर्तगत जास्तीत जास्त ५० मधुमक्षिका संच, ५० स्टँडर्ड मधुमक्षिका पेटी व मध काढणी यंत्र व फुड ग्रेड मध कंटेनर खरेदीसाठी अनुदान देय असून यापेक्षा कमी खरेदी केल्यास त्याच्या प्रमाणात अनुदानाचा लाभ देय आहे. (संदर्भ :- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंमलबजावणी मार्गदर्शक सूचना सन - २०१८-१९)

**अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज आवश्यक कागदपत्रासह अपलोड करावा.
२. निवडलेल्या लाभार्थीने गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत मधुमक्षिका वसाहत, संच व मध काढणी यंत्र इत्यादीची खरेदी करावी.
३. पूर्वसंमती मिळाल्या पासून एक महिन्याच्या आत मधुमक्षिका व इतर आवश्यक बाबींची खरेदी करून ऑनलाईन अनुदान मागणी करावी.
४. मधुमक्षिका पालनासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.
५. मधुमक्षिकापालन या घटकांतर्गत अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे करावी. सोबत खरेदी देयकांच्या मूळप्रती व खरेदी समितीचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने स्व:साक्षांकीत करुन ऑनलाईन अपलोड करावे.

## मधुमक्षिका खरेदी समिती :

१.सरपंच - अध्यक्ष
२.उपसरपंच - सदस्य
३.इतर ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) महिला सदस्य - सदस्य
४.कृषि मित्र/कृषि ताई - सदस्य
५.कृषि सहाय्यक - सचिव

(अनुक्रमांक १, २, ३ पैकी किमान १ सदस्य, कृषि मित्र/कृषि ताई, कृषि सहाय्यक व लाभार्थी यांची खरेदीच्या वेळी उपस्थिती अनिवार्य)

**खरेदी समितीच्या कार्य व जबाबदाऱ्या :**

१. खरेदी समितीने मधुमक्षिका खरेदी कोठून व कोणत्या प्रकारे/पद्धतीने करावयाची आहे, याबाबत निर्णय उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार घ्यावा.
२. गावातील निवड झालेल्या पात्र सर्व लाभार्थ्यांची मधुमक्षिका वसाहत, संच व मध काढणी यंत्र यांची खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.
३. लाभार्थीनी खरेदी केली असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र खरेदी समितीने सादर करावे.

**ग्राम कृषि संजीवनी समिती**

१. इच्छुक लाभार्थ्यांचे घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करुन अर्जांची भूमिहीन व्यक्ती, अत्यल्प व अल्प भूधारक प्रवर्ग निहाय अनु. जाती, अनु. जमाती, महिला, दिव्यांग, इतर या प्राधान्यक्रमाने निवड करणे.
२. इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन प्राप्त अर्ज व कागदपत्रांची छानणी करून अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
३. मधुमक्षिका खरेदी समिती नियुक्त करून तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. इच्छुक लाभार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी करणे.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झालेनंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. लाभार्थ्यांस "मधुमक्षिका पालन" या घटकाच्या अटी व शर्ती तांत्रिक निकष समजावून सांगावे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. लाभार्थीने ऑनलाईन अर्ज व सोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छाननी आधारे पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन तपासणी सूचीनुसार प्रकल्प स्थळ मधुमक्षिका पालनासाठी योग्य आहे किंवा नाही, याबाबत स्थळ पाहणी अहवाल संकेतस्थळावर नोंद करावा व प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
३. लाभार्थीने यापूर्वी मधुमक्षिका पालनाचा इतर शासकीय अथवा या योजनेतून लाभ घेतला आहे काय, याबाबत खातरजमा करून स्थळ पाहणी अहवालात नमूद करणे.
४. लाभार्थ्यांनी मधुमक्षिका प्रकल्प स्थळी पुरवठा झाल्याचे ऑनलाईन कळविल्यानंतर खरेदी करण्यात आलेल्या मधुमक्षिका मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे योग्य असल्याबाबत तपासणी करून मोका तपासणी अहवाल ऑनलाईन अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. तसेच प्रकल्पाच्या DBT App द्वारे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश/रेखांशसह भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
१. अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी अनुदान अदायगी पूर्वी लाभार्थी संख्येच्या २५% लाभार्थींची तपासणी करावी. अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून देय अनुदान अदायगीसाठी योग्य असलेबाबत खात्री करून पर्यवेक्षकीय अहवाल सादर करावा.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

ऑनलाईन अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यासाठीचे लेखाधिकारी उपविभागस्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उप विभागीय कृषि अधिकारी**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांची छाननी नंतर पात्र/ अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबंधित लाभार्थी यांना ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
२. तपासणी अहवालासह ऑनलाईन शिफारस झालेल्या योग्य प्रस्तावांची देय अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अदायगी करण्यास मंजुरी द्यावी.
३. कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर यादृच्छिक (Random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या ५% अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.
४. लाभार्थ्यांना प्रशिक्षण आयोजित करणे.
५. योजनेचे संनियंत्रण करणे.

**प्रकल्प संचालक, आत्मा**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या किमान १% तपासणी करावी.

## योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल.
२. लाभार्थ्याने सदरचा व्यवसाय हा किमान ३ वर्षे करणे आवश्यक आहे.
३. या घटकास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, कार्यमहिमा, मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
४. या घटकांतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना आवश्यकतेनुसार मधुमक्षिका पालनाचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
५. मधुमक्षिका पालनासाठी आवश्यक इतर व्यवस्था लाभार्थ्यांने स्वतः करावयाची आहे.

## खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री/श्रीमती------------------------------------------------ मु.पो.------------------तालूका ------------------- जिल्हा --------- यांनी मधुमक्षिकापालन या घटकांतर्गत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत विहित केलेल्या बाबी खरेदी समिती व खरेदी समिती सचिव (कृषि सहाय्यक) यांच्या समक्ष सदर घटकासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून खरेदी करणेचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे.

खरेदीचा तपशिल-

| तपशिल | संख्या | दर (रु.) | एकूण खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| मधुमक्षिका संच | | | |
| मधुमक्षिका वसाहत | | | |
| मध काढणी यंत्र व फुड ग्रेड मध कंटेनर | | | |

| | **(स्वाक्षरी)** | **(स्वाक्षरी)** | **(स्वाक्षरी)** |
|---|---|---|---|
| | **लाभार्थी** | **खरेदी समिती सचिव** | **खरेदी समिती सदस्य** |
| दिनांक- | | **(कृषि सहाय्यक)** | |
| ठिकाण- | **(नाव )** | **(नाव )** | **(नाव )** |

**(स्वाक्षरी)**
उपस्थित खरेदी समिती
कृषि मित्र/ कृषि ताई

**(नाव )**

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-          /     /२०
२. तपासणी अधिकारी :- श्री.          पदनाम
३. तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी -
  १.श्री.          पदनाम
  २.श्री.          पदनाम
४. लाभार्थ्याचे नाव - श्री.
  गांव     ता.     जि.
  सर्वे नं ( असल्यास )
५. बाब - मधुमक्षिका पालन
६. प्रकल्पाचे ठिकाण
७. देयकाची एकुण रक्कम रु.
८. लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु.
९. तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? **होय / नाही**
१०. नसल्यास तफावत रक्कम रु.
११. मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? **होय / नाही**
१२. लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय
१३. गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव...................)**